# राशिभविष्य - फेब्रुवारी , २०१५ .

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार ्धअनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. शासकीय, निम-शासक ीयनोकरदार मंडळीना पगारवाढ, बढती, उच्च पद अशा प्रकारचे लाभ होणे संभवते. सामान्य नोकरदार मंडळीनाही त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार कमी-अधिक स्वरूपाचे लाभ होतीलच. गृहसौख्य लाभेल. काही मंडळीचे स्थावर खरेदी-बिक्रीचे व्यवहार होतील. पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना काळ लाभदायक होईल. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनीमुळे अनारोग्य बळावण्याची शक्यताही जाणवते. असमाधानकारक घटना घडतील व असहृय मनस्ताप सहन करावा लगण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक घोटाळे, आर्थिक नुकसान, येणारे धन मिळण्यास होणारा विलंब असे अनुभव येण्याची शक्यता दिसते. लहरी, चंचल स्वभावावर नियंत्रण ठेवू शकलात तरच हातून पश्चात्ताप करावा लागण्यासारखे काही घडणार नाही. काही मंडळीना जुन्या दबलेल्या घटनांचा असहृय त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. काही मंडळीना बेअब्रूच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागेलसे दिसते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगजानन व श्रीहनुमान उपासना अनुकुल व लाभदायक होईल. -

**(२) वृषभ -** या र ाशीच्यामंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनु ूकुलव लाभदायक होणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धातरवि -बुध प्रतिकुल असल्यामुळे मानसिक ताण, वाद, भांडणे, विरोध, मानहानी अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या पंचम स्थानी असलेल्य ाराहूमुळे वरील कारणामुळेच कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना अनुकुल व

लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनीमुळे स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्यामुळे वैवाहिक सुख लाभणे कठीण दिसते. तसेच भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लेखकवर्गाचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होणे शक्य आहे. अनुकुल काळाचा लाभ घ्या. तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाही काळ प्रगतीकारक व लाभदायक होईल. काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे शक्य आहे. प्रवासाचे योग येतील. सामान्य नोकरदार मंडळीना कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ करून घ्यावा लागेल. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. श्रद्धेने हनुमान उपासना करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अनुकुल प्रतिकुल अनुभवांना सामोरे जावे लागणार आहे. उच्च राशीतील गुरु ग्रह कौटुंबिक सुख देण्याचा प्रयत्न करील, तर चतुर्थ स्थानी असलेला राहू कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण कारीलसे दिसते. धनस्थानी असलेला गुरु कुटुंबात शुभ घटना घडवील, आर्थिक प्रगती करील, नोकरी-व्यवसायात अनुकुल घटना घडवून आणील. पण रवि ग्रह प्रतिकुल असल्यामुळे नोकरीत मनस्ताप सहन करावा लागेल व त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. त्याशिवाय जीवनसाथीचे व मुलांचे अनारोग्याचा प्रश्नही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची लागण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. तसेच शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरदार मंडळीना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल व अधिकारी मंडळीच्या विरोधाचा त्रास सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणाराच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता जाणवते. पण गुरु-हर्षल शुभ योगामुळे काही लाभदायक घटनाही घडण्याची शक्यता आहे. तसेच चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना महिन्याचा उत्तरार्ध प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या युवकांनी आहे ती नोकरीच करावी. नवीन काही करण्याचा विचारही करू नये. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याच्या काळात रवी-बुध हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे जीवनसाथीशी मतभेद, भांडणे होणे संभवते. काही मंडळीना ताप, पोटदुखीचा त्रास , अपचनाचा त्र ासअशापैकी आजार होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथी व संततीच्या आजारपणास तोंड द्यावे लागेल. काही मंडळीना मानसिक, शारीरिककष्ट परिश्रम सहन करावे लागतील, तर काहीना मूळव्याधीसारख्या उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. अपघातभय आहेच. यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. सूचक स्वप्ने पडतील. काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. मुलांपैकी कोणास झालेला आजार, कोणास आलेले नैराश्य, कोणाची अन्य समस्या अशापैकी कारणांनी संततीसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे मधूनमधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे बौद्धिक , शैक्षणिकव शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना साहित्यिकांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करू शकाल; पण भावंड सुखात काही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे श्रद्धेने पठण करा

**(५) सिंह** - या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व प्रगतिकारक होणार आहे. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा, हे उत्तम. महिन्याचा उत्तरार्ध केवळ बौद्धिक कार्यक्षेत्र असणारानाच काही प्रमाणात अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला शत्रुराशीतील शनि मातृसुखास व गृहसौख्यास बाधक असा सिद्ध होईल. जपा काही मंडळीना स्थावरविषयक चिंता त्रस्त करील. राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच आर्थिक समस्या त्रस् त करील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले नेपच्यून व मंगळ दाम्पत्यजीवनात कटकटी निर्माण करतील व त्यामुळे स्वत:चे व जीवनसाथीचे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार- व्यवसाय असेल त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी.

महिन्याच्या उत्तरार्धात काहीना मूळव्याधीसारख्या उष्णताविकाराचा त्रास होणे संभवते. तसेच काही मंडळीना त्वचा रोग, मुखदंत रोग त्रस्त करतीलसे दिसते. जपा. सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. या राशीच्या व्ययस्थानी उच्च राशीत असलेला गुरु ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल आहे. म्हणून प्रतिकुल परिस्थितीत मन:शांतीसाठी गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना नोकरी - व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मनात संताप, डूख न धरता सरळ मनाने आचरण केलेत तर गुरुकृपेने फारसा मनस्ताप सहन करावा लागणार नाही. महिन्याच्या पूर्वार्धात सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. जपा. तसेच नोकरीत अधिकारीवर्गाचा त्रास , घरी प्रि य जनांच्या दूरत्वामुळे येणारे नैराश्य , अस्वस्थ मन, स्वत:चे व संततीपैकी कोणाचे आजारपण, कोणाची अव्रणविषयक समस्या अशापैकी कारणांनी असह मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात नोकरदार मंडळीना काळाची अनुकुलता अनुभवता येईल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. अनेक मार्गांनी अर्थलाभ होणे संभवते. काही मंडळीना वाहनसुख मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. युवकयुवतींचे विवाह ठरतील. नवे मित्र लाभतील. पण वैवाहिक जीवनातील सुखात मात्र विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. काहींना कुसंगतीचा त्रास होण्याची शक्यता जाणवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. संयम आणि सहनशीलता अंगी बाणण्यासाठी व मन आणि बुद्धी संयमित व शांत राहण्यासाठी आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात कौटुंबिक सुख समाधान लाभण्याचीशक्यता दिसत नाही. आर्थिक समस्या, कुटुंबात घडणाऱ्या अनिष्ट घटना, कार्य दिरंगाई, खर्च वाढ, प्रिय जनाचे होणारे स्थलांतर, अशापैकीकारणांनी सतत

मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे अनारोग्य, कोणाची अन्य समस्या अशापैकी कारणांनी सतत डोक्याला त्रास व मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण राहूमुळे धनलाभ कोणाला परदेशगमनाची संधी, कोणाला शत्रूपासून रक्षणअशापैकी मनोनुकुल घटना घडतील. पण महिन्याच्या पूर्वार्धातया राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. अकारण दगदग करूनये. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याचा उत्तरार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होणार असला तरी शारीरिक-मानसिक कष्ट, उष्णताविकारांचा त्रास , कोणाला हृदयविकाराचा त्रास कोणाला अपप्रचाराचा त्रास , कोणाला चोरी वा अर्थहानीचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच काहीना डोकेदुखी वा मेंदूविकार त्रस्त करतील. बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहेच याची जाणीव ठेवून मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून काळ व्यतीत करावा, हे उत्तम. श्रीहनुमान उपासना करा व नियमाने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात स्वत:च्या आणि जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागेलसे दिसते. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे अन्य ठिकाणी वास्तव्यास जाणे होण्याचीशक्यता दिसते. तसे घडले तर नैराश्य येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, व लाभदायक होईल. वरिष्ठ प्रशंसा करतील. काहीना बढती, वेतनवाढ तर काहीना उच्च पद वा मानाचे स्थान मिळणे संभवते. मात्र अधिकार मिळाला तरी वाम मार्ग धन मिळविण्याचा विचारही मनात आणू नये.. तसेच जुगाराचा नाद असेल तर तोही सोडाच. निकासान होईल. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. असमाधानकारक घटना घडणे, राहत्या जागेची समस्या त्रस्त करील. स्थावर असेल तर त्यासंबंधी चिंताही मनस्ताप देणे शक्य आहे. तसेच संततिसुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी मन शांत व आनंदी राखावे. अकारण दगदग करू नये. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते , गूढ संशोधन, उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र

असणारांना तसेच कलावंताना महिन्याचा उत्तरार्ध्र अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे प्रगती व सात्विक सुखशांती लाभेल. श्रीगणेश , श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट ध्यानात घेऊनच सतत सावधानतेने आचरण करावे. मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून दैनंदिनकर्तव्ये पार पाडा. तरच मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास त्यांचा फारसा त्रास होणार नाही. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. फसवणूक होणे संभवते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. स्वत:ची मानहानी होणार नाही याची काळजी घ्या. खर्चावर नियंत्रण ठेवा. अति विचार करू नका. उष्णताविकारांचा - विशेष करून नेत्रविकाराचा त्रास होणे संभवते. तसेच आप्तेष्ट मंडळीशी वाद, भांडणे, दुरावा अशा मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. वास्तुसुखही लाभण्याची शक्यता दिसत नाही. आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशीही पटणार नाही. जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून सुखकारक घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील त्यामुळे महत्वाकांक्षा वाढेल. मन अत्यंत भावनाशील होईल. त्यामुळेअध्यात्माची गोडी असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभेल. अशा परिस्थितीत या राशीच्या काहीमंडळीना परदेशगमनाची संधी मिळण्याचीशक्यता दिसते. काहीना जलप्रवासाचा योग येणेही शक्य आहे. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या राहूमुळे नोकरीत काही भाग्यवंताना अधिकार वा सत्ता स्थान प्राप्त होईल. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना अचानक धनलाभ प्राप्त होईल; किंवा वारसा हक्काने धनप्राप्ती होईल. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्याकाळात सर्वांगीण आरोग्याकडे लक्ष देणे अगत्याचे होईल. उष्णता विकारांचा त्रास होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी अति विचार करू नये व मन सतत शांत राखण्याचा प्रयत्न करावा. सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे असह्य मनस्ताप होईल. जपा. नियोजित कार्यात अडथळे येणे, पीछेहाटहोणे, फसवणूक होणे, आर्थिक नुकसान होणे,

आर्थिक जबाबदाऱ्या वाढणे, मिळणारे पैसे वसूल न होणे, खर्चाची तोंड मिळवणी करण्यासाठी अधिक कष्ट परिश्रम करणे यामुळे शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार , घसा, मान, दाढा यांचे आजार होणे संभवते. जपा. त्यात भर म्हणूनआप्तेष्ट भांडणे, वाद यांमुळे त्रस्त व्हाल. जपा. बुद्धी विकृत होऊन हातून नको ते घडण्याची शक्यता दिसते. जपा. मुलांपैकी कोणाचेअनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभणे कठीण दिसते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. उच्च व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, राजकारणी मंडळीना तसेच वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे विवाहेच्छूचे विवाह ठरतील, नवे स्नेहसंबंध जुळून येतील. अर्थलाभ होणेही संभवते. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. रवी-मंगळ-शनि-हर्षल हे महत्त्वाचे सर्व ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केले तरच गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. सध्या या राशीच्या मंडळीची बुद्धी व मन अतिशय तप्त झाले असणे संभवते. त्यामुळेमनाविरुद्ध काहीही घडले तरी तोंडाचा पटटा चालू होणे संभवते. जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण केलेत तरच मनस्ताप सहन करणे शक्य होईल. असह्य मनस्तापामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचे आजार होणे संभवते. डोळे तळावणे, घसा, मान, दाढा दुखणे, हट्टी स्वभावामुळेशरीरपीडा, श्रम , दगदग सहन करावी लागणे असे त्रास सहन करावी लागण्याची शक्यता आहे. जपा. त्यामुळे नैराश्य येणेही संभवते. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर खूपच काळजी घेतली पाहिजे. नोकरी-व्यवसायास संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे नवीन काही करण्याचा विचारही करू नका. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शुक्र शुभ योगांमुळे आरोग्य चांगले राहील, कौटुंबिक सुख लाभेल, कुटुंबात शुभ घटना घडतील. पण नोकरीत अधिकारपद

असणारांनी मात्र वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न करू नये. असा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. तसेच ऋण काढून सण साजरा करू नका. स्वतंत्र व्यवसाय असणारांनी आहे तो व्यवसायच व्यवस्थित चालविण्याचा प्रयत्न करावा, हे उत्तम नव्या उलाढाली करू नये. श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल .

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण त्यासाठी मन व बुद्धी स्थिर राखून चंचल स्वभावावर नियंत्रण ठेवताआले पाहिजे. अध्यात्म असो, उच्च शास्त्रीय संशोधन क्षेत्र असो, कोणताही नोकरी-व्यवसाय असो, वरील गोष्टींवर नियंत्रण ठेवता आले नाहीतर " दैव देते, कर्म नेते" अशी अवस्था होईल. जपा. इच्छा आकांक्षा पूर्ण होण्यासाठी , यश, धन प्राप्तीसाठी महिन्याचा पूर्वार्धअतिश य अनुकुल आहे. पण काळाच्या सत्वपरीक्षेत उत्तीर्ण होता आले पाहिजे. आरोग्य दृष्ट्या काळ प्रतिकुल आहे. गैर समजुती, मानहानी , असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. घरीदारी सर्व ठिकाणी मनस्तापच सहन करावा लागेल. त्यासाठी ईश्वरी साहाय्य हवेच. म्हणून श्रद्धेने शिवोपासना करा. तसेच गुरुदेव दत्तात्रेयाची उपासनाही अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात त्रास होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घ्यावी लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात अधिक सावधानतेने , नम्रपणाने व सहनशीलतेने आचरण झाले तर शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. तसेच गुरुकृपेने संततिसुख लाभेल. या राशीच्याविद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. प्रेमसंबंध निर्माण होतील. जपा.

=====000O000=====